# प्रकरण तिसरे

## ' अपरंपार ' अभिव्यक्तीदृष्ट्या विचार

या आशय विचारानंतर अभिव्यक्तीदृष्ट्या ' अपरंपार ' या कादंबरीचा विचार करावयाचा.

बीडच्या शहरी वातावरणात वावरणाऱ्या श्रीनिवासच्या विवाहापासून कादंबरीची सुरुवात होते. अभिव्यक्तीदृष्ट्या विचार करतांना त्यातील भाषाशैली, निवेदनशैली, संदर्भ, अलंकार, शीर्षक इत्यादी यांचा विचार करावयाचा.

कादंबरीचे कथानक श्रीनिवासच्या विवाहापासून ते नंदाच्या इच्छाआकांक्षा, भावना यांची पूर्तता न होण्यापर्यंत आहे. कादंबरीत वेगवेगळे प्रसंग असून ते एकमेकांशी संलग्न आहेत. प्रमुख पात्रापासून ते गौण पात्रापर्यंत सर्वांचा कथानकाशी महत्त्व पूर्ण संबंध आहे कादंबरीचे कथानक वास्तवतेला जवळचे वाटणारे असून ते श्रीनिवास या निवेदकाच्या तोंडून उलगडत जाते.

भाषाशैली :

भाषाशैलीला कादंबरीमध्ये स्वतंत्र स्थान आहे. विचार व भावना शब्दांच्याद्वारे व्यक्त करण्याचे महत्वाचे कार्य भाषा करते. पण ' शैली ' शब्दांने भाषेला मिळालेले वळण ' असा अर्थ सूचित होतो. प्रत्येक लेखकाच्या शैलीवर देश-काल परिस्थितीचा आणि व्यक्तित्वाचा प्रभाव असतो. अनुकूल वातावरणनिर्मिती अनुरुप शब्दांच्या द्वारे करावयाची असते. तसेच पात्रपरिचय व वचनांचे निवेदन रेखीव व समर्पक शब्दांनी करुन ती पात्रे, घटना व प्रसंग वाचकांच्या डोळ्यांसमोर उभे करण्याचे सामर्थ्य भाषेत असते. ' सहजसुंदरता ' व ' स्वाभाविकता ' हे दोन भाषाशैलीचे गुण मानण्यात येतात.

वि. शं. पारगांवकरांची भाषा ही तात्काळ वाचकांना नव्या वातावरणात घेऊन जाते. काही उदाहरणांवरुन हे दाखविता येते. या कादंबरीत श्रीनिवास हा नानांचा थोरला व एकुलता एक मुलगा आहे. त्याचे लग्न ठरवतात पण श्रीनिवास नंदाला पाहिल्यानंतर स्वतःचे भान पूर्णपणे विसरतो. व नंदाचा रात्रं दिवस ध्यास घेतो. तेव्हा श्रीनिवासला त्याची बहीण चिडवते, चेष्टा करते. त्यावेळी ती म्हणते " बरं हो आजोबा त्याची तुम्ही नका काळजी करु. तुम्ही आपल चिंतन करीत बसा तिचं रात्र रात्र जागून ! " ३३ या शशीच्या शब्दांतून एक आत्मिक प्रेम, स्वभावातील मिस्किलता दिसून येते. व आपल्यापुढे बहीण- भावाच्या स्वभावातील विशुध्द नाते प्रकट होते.

तसेच जेव्हा श्रीनिवास आपल्याला नंदा पसंत आहे असे अनेक पध्दतीने सांगतो तेव्हा श्रीनिवास व सगुणाबाई आपली मते स्पष्ट करतात.

" अरे पण एवढी घाई काय आहे? अजून जरा विचार कर !. "

" त्यात कसला विचार करायचा ? "

" तिला एकविसावं वर्ष चालू आहे; आणि मला चोविसावं. " ३४

या आई - मुलाच्या बोलण्यातून पारगावकरांनी पुढील भविष्याच्या घटना सूचित केलेल्या आहेत. पारगांवकरांनी श्रीनिवास, शशी व सगुणाबाई यांच्या बरोबरच नंदा व तिची माहेरची मैत्रीण चंद्रा यांच्यातील भावसंबंध स्पष्ट केलेला दिसून येतो.

" किती बदललीस ग लग्न झाल्यावर तू ? "

" ते कसं काय ? "

" तुझं तुला ते कळतयं, मी फोड करून का सांगायला पाहिजे ! " ३५

असे बोलत - बोलत चंद्राने स्नेहभराने तिचा हात हातात घेतला आणि प्रेमाने तिला खाली बसविले आणि लहानपणातल्या गप्पांना रंग येतो. चंद्रा म्हणते,

" तुला आपलं लहानपण आठवतं नंदा ? "

" तू माझी थट्टा करतेस काय ? "

" थट्टा नेहमी करते तुझी मी, पण आता नाही केली "

" लहानपणी आपण किती एक जिवानं राहत होतो. तुझ्या घरात काही नवं - जुनं केलं की मला बोलावून दिल्याशिवाय तू ते खात नव्हतीस, आणि काही नवीन घडलं की तुला ते सांगितल्याशिवाय मला चैन पडत नव्हती, झोपच येत नव्हती " ३६

या त्यांच्या संभाषणातून लहानपणातील आठवणी स्पष्ट होताना दिसतात. पारगावकरांनी नंदा व चंद्रा यांच्या माध्यमातून जुन्या आठवणींनं उजाळा देण्याचा प्रयत्न केला आहे. यातून स्त्रीविषयक भावना, एकमेकांबद्दल असणारी ओढ, आस्था इत्यादी वैशिष्ट्ये पारगावकरांनी वरील पात्रांच्या माध्यमातून स्पष्ट केली आहेत. यातूनच त्यांच्या भाषानिवेदनाचा प्रभाव दिसून येतो.

त्याचप्रमाणे नंदा व कुसुम यांच्या भावनिक अवस्थांचे रेखाटन पारगावकर उत्कृष्ट प्रकारे करताना दिसतात. कुसुम नंदाला म्हणते,

: सांग ना नंदा, तू का श्रीनिवासशी लग्न केलंस ? "

" मी नाही केलं लग्न त्यांच्याशी ? "

" मग कुणी केलं ? "

" त्यांनी माझ्याशी केलं ! "

" तुझं उत्तर बरोबर आहे. माझंही तेच आहे. इंद्रनाथने माझ्याशी लग्न केलं " या त्यांच्या बोलण्यातून एकमेकींची दुःखेच व्यक्त होतात.

तसेच नंदाची आई आपल्या मुलीबद्दल चिंता व्यक्त करताना दिसते. तिच्या मनाची अवस्था , मुलीबद्दल असणारे प्रेम पारगावकर मोजक्या शब्दांत स्पष्ट करतात., " अशी एका एकीच आलीस ! अगोदर काही कळवायचं वगैरे नाही वाटलं ? अन हो, थांब जरा तिथंच " ३८ यातून आईची वत्सल भावमूर्ती साकार होते.

नंदाची आई आपल्या मुलीला कसे राहायचे, आपला नवरा , सासू , सासरे यांच्याबद्दल आदर कसा राखायचा हे सांगते . तुझा जन्म स्त्रीचा आहे. दुसऱ्याचे घर आता तुला आपले समजायला हवं . तुझा नवरा जे म्हणेल ते ऐकायला हवे आणि तो तुझ्यापासून जे मागेल ते त्याला द्यायला हवे असे नंदाची आई सांगते . या तिच्या सांगण्यातून आत्मिक प्रेम , जिव्हाळा दिसून येतो. आपल्या मुलीने संसारात सुखी राहवे , तिने सासरच्या लोकांची मने जिंकावी असेही तिला वाटते.

अशा प्रकारे पारगावकरांनी निवेदनातून , संवादातून तर कधी वर्णनातून पात्रांच्या मनाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

शीर्षक :

कादंबरीत ' अपरंपार ' हे एक प्रतीक म्हणून आले आहे. अपरंपार म्हणजे अफाट दुःख आणि हे दुःख श्रीनिवास , नंदा , कुसुम , नाना व सगुणाबाई यांचे आहे. इच्छा , आकांक्षा , भावना , प्रेम यापासून वंचित असणाऱ्या पुरुषांची दुःखे या कादंबरीत आली आहेत. यातील श्रीनिवास भावनिक आहे. संपूर्ण कदंबरीमध्ये तिचे दुःख अलौकिक आहे पण ती ते संयमाने सहन करते.

नंदाच्या भावनेचा होणारा कोंडमारा आणि दुःख विसरण्यासाठी तिने माहेरचा घेतलेला आधार . तरीही तिचे दुःख कमी होत नाही हीच नंदाची अर्थात या कादंबरीच्या नायिकेची शोकांतिका आहे.

शीर्षकानंतर कादंबरीच्या प्रारंभ , शेवटाचा विचार करावयाचा.

प्रारंभ :

' अपरंपार ' या श्रीनिवासच्या विवाहापासून सुरू होतो. यामध्ये भूतकाळ व वर्तमानकाळ यावर आधारलेल्या वास्तव जीवनाचे चित्रण आले आहे.

अनेक मुलाप्रमाणेच श्रीनिवासला मालती ही एक थोराड बांध्याची , ग्रामीण संस्कार असलेली मुलगी सांगून येते. तिचे सौंदर्य पाहून त्याला रात्र - दिवस झोप येत नाही. कादंबरीतील पहिलेच वाक्य श्रीनिवासची बहीण शशी उच्चारते, " रात्री ताप बिप आला होता काय रे ? " ३९ या अवतरणाने प्रारंभ झालेल्या आणि श्रीनिवासने उच्चारलेल्या " नाही बुवा ! का ? " ४० या बहीण भावाच्या पहिल्या वाक्यातून असे

जाणवते की, कादंबरीतील श्रीनिवास व शशी ही शहरी वातावरणात वावरणारी प्रतिष्ठित आहेत. यातील श्रीनिवास स्वीसुखासाठी उतावीळ, भावनिक, व कामांधवृत्तीचा आहे.

शेवट :

कादंबरीचा शेवट पुढीलप्रमाणे येतो. नंदा माहेरहून सासरी येते त्यावेळी घरी नाना असतात पण तेही देवाला जातात. थोड्याच वेळाने इंद्रनाथ घरी येतो. त्याच्या या आकस्मिक येण्याने ती घाबरते आणि आपले अंग त्याच्या अंगावर झोकून देते. इंद्रनाथ नंदाला सावरण्याचा प्रयत्न करतो. यावेळी दोघेही एकमेकांच्या स्पर्शाने बेभान झालेले असतात. नंदाचे सर्व शरीर पेटून उठते. कारण श्रीनिवासच्या स्पर्शापेक्षा हा स्पर्श तिला वेगळा वाटतो. पण थोड्याच वेळाने इंद्रनाथ नंदाचा निरोप घेतो. आणि तोपर्यंत सगुणाबाई घरामध्ये प्रवेश करतात.

श्रीनिवास थोड्यावेळापूर्वीच घरी आला होता. त्याने जेवण न करताच थोडे दूध घेऊन माडीवर गेला. थोड्यावेळाने नंदा माडीवर जाते तेव्हा श्रीनिवासच्या कामवासना जाग्या होतात. बरेच दिवसाच्या दुराव्यामुळे आणि श्रीनिवासच्या स्पर्शामुळे तिला रक्तातील यौवन् - यौव तापला जातो. तिचे सर्वांग पुलकित झाले होते. साऱ्या देहाचा आटापिटा चालला होता. तिची भावना शमण्याऐवजी वाढली होती. श्रीनिवास मात्र एक - दोन मिनिटेच टिकला आणि तो स्वस्थ झोपला. पण नंदाचे डोळे काळोखात सताड उघडेच होते. तिच्या कामवासना वाढल्या होत्या. तिला श्रीनिवासचा दुबळेपणा जाणवतो. आणि दुःखाने ती झोपी जाते. तिचे दुःख अपरंपारच होते, हे खरे.

या कादंबरीत वरील वैशिष्ट्ये असली तरी काही दोषही जाणवतात. उदा. नंदाच्या उरोजाचे वर्णन (पृष्ठ क्रमांक ४० वरील वर्णन ) हे अतिरंजित वाटते त्याच प्रमाणे इंद्रनाथ कुसुमवर जो अत्याचार करतो. ( पृष्ट क्रमांक -८१,८२) तो देखील अस्वाभाविक वाटतो. थोडक्यात असे असले तरी वरील सर्व विवेचनावरून असे म्हणता येईल की, आटोपशीर कथानक , वेधक व्यक्तिचित्रे, प्रभावी जीवनदर्शन , परिणामकारक संघर्ष कथानकाला गती देणारा व्यक्ती -व्यक्तीतील परस्पर संबंध आशयानुरूप भाषाशैली, अन्वर्थक शीर्षक, आकर्षक प्रारंभ व परिणामकारक शेवट ही या कादंबरीची वैशिष्ट्ये आहेत.

## प्रकरण तिसरे

### " संदर्भ "


१. वि. शो. पारगांवकर, - ' अपरंपार '
पुणे, प्रकाशन - १९७० पृ.- ६

२. तत्रैव, - पृष्ठ - ६

३. तत्रैव, - पृष्ठ - १२

४. तत्रैव, - पृष्ठ - १४

५. तत्रैव, - पृष्ठ - १६

६. तत्रैव, - पृष्ठ - १६

७. तत्रैव, - पृष्ठ - ५८

८. तत्रैव, - पृष्ठ - ७०

९. तत्रैव, - पृष्ठ - ८२

१०. तत्रैव, - पृष्ठ - ९६

११. तत्रैव, - पृष्ठ - १०९

१२. तत्रैव, - पृष्ठ - ११५

१३. तत्रैव, - पृष्ठ - ११६

१४. तत्रैव, - पृष्ठ - ११९

१५. तत्रैव, - पृष्ठ - १२०

१६. तत्रैव, - पृष्ठ - १२२

१७. तत्रैव, - पृष्ठ - १२३

१८. तत्रैव, - पृष्ठ - १२४

१९. तत्रैव, - पृष्ठ - १२५

२०. तत्रैव, - पृष्ठ - ५२

२१. तत्रैव, - पृष्ठ - ८४

२२. तत्रैव, - पृष्ठ - १७

२३. तत्रैव, - पृष्ठ - ७७

२४. तत्रैव, - पृष्ठ - ७७

२५. तत्रैव, - पृष्ठ - ५७

२६. तत्रैव, - पृष्ठ - ४९

२७. तत्रैव, - पृष्ठ - १४

२८. तत्रैव, - पृष्ठ - ९९

२९. तत्रैव, - पृष्ठ - ०३

३०. तत्रैव, - पृष्ठ - ७०, ७६

३१. तत्रैव, - पृष्ठ - ३९

३२. तत्रैव, - पृष्ठ - ६७

३३. तत्रैव, - पृष्ठ - ७५, ७६

३४. तत्रैव, - पृष्ठ - ०३

३५. तत्रैव, - पृष्ठ - ०६

३६. तत्रैव, - पृष्ठ - ०७

३७. तत्रैव, - पृष्ठ - ११

३८. तत्रैव, - पृष्ठ - १३

३९. तत्रैव, - पृष्ठ - १७

४०. तत्रैव, - पृष्ठ - ८३

४१. तत्रैव, - पृष्ठ - ०२

४२. तत्रैव, - पृष्ठ - ०८

४३. तत्रैव, - पृष्ठ - ३७, ३८

४४. तत्रैव, - पृष्ठ - ७८

४५. तत्रैव, - पृष्ठ - ११५

४६. तत्रैव, - पृष्ठ - ०६

४७. तत्रैव, - पृष्ठ - ११३

४८. तत्रैव, - पृष्ठ - ११४

४९. तत्रैव, - पृष्ठ - ७५

५०. तत्रैव, - पृष्ठ - ०२

५१. तत्रैव, - पृष्ठ - ०२